# कारशेडसाठी कांजुरवर भर

jayant.howal @timesgroup.com

**मुंबई : कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो ३ कारशेडसाठी कांजुरमार्ग आणि आरे कॉलनीचा पर्याय मुख्यमंत्र्यांनी नियुक्त केलेल्या समितीच्या अहवालात असून, कांजुरमार्ग येथील जागेच्या उपयुक्ततेवर भर देण्यात आला आहे. कांजुरमार्ग येथील जागा घेतल्यास प्रस्तावित सीप्झ-कांजुरमार्ग मेट्रो प्रकल्प मेट्रो ३ ला जोडता येईल असेही अहवालात म्हटले आहे.**



मुख्यमंत्र्यांनी नेमलेल्या समितीच्या अहवालात शिफारस

## मटा विशेष

मात्र, या दोन्ही जागांवर उपक्रम राबवतानाही अडचणींचा सामना करावा लागेल. कांजुरची जागा ही सहज उपलब्ध होईल, या जागेवर कारशेड उभारताना पर्यावरणाची कमीत कमी हानी होईल, मेट्रो ३ ला ईस्टर्न एक्स्प्रेस हायवेची तसेच प्रस्तावित जोगेश्वरी-कांजुरमार्ग मार्गाची जोड मिळेल, कांजुर परिसरात बजबजपुरी नसल्याने प्रकल्प उभारणीत सुलभ होईल, भांडुप-कांजुरमार्ग व त्यापुढे ठाणे परिसराला कनेक्टिव्हिटी मिळेल, यावर अहवालात झोत टाकण्यात आला आहे.

या जागेच संपादन आणि अन्य अडचणींकडेही अहवालात लक्ष वेधले आहे. कांजुरच्या जागेविषयी कोर्टात वाद सुरू असून, हा वाद मिटून जागा लवकर ताब्यात येणे गरजेचे आहे. अन्यथा प्रकल्प रखडू शकतो. या जागेवर कारशेड उभारायची झाल्यास मेट्रो चा मार्ग साडेसात कि.मी. ने वाढेल व प्रकल्पखर्च १७०० कोटी रुपयांनी वाढेल.

आरे कॉलनीत कारशेड उभारण्याविरोधात तीव्र आंदोलन उभे राहिल्यानंतर पर्यायी जागा शोधण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी समिती नेमली होती. या समितीने आरे कॉलनीचीही पाहणी केली. पर्यावरणाची हानी न करता कारशेड कशी उभारता येईल याचा उहापोह समितीने केला आहे. मेट्रो मार्ग अंशत: उत्तरेकडे वा पश्चिमेकडे सरकवावा, पूर्ण कारशेडच उत्तर दिशेला न्यावा, झाडांना जास्त बाधा पोहचू नये म्हणून जागेचा आकार कमी करावा, अशा चार पर्यायांवरही विचार झाला. पहिल्या पर्यायामुळे आणखी एक हजार झाडे तोडावी लागतील, दुसऱ्या पर्यायामुळेही तसेच होईल शिवाय कारशेडसाठी पुरेश जागा उपलब्ध होणार नाही, तिसऱ्या पर्यायात झाडांना कमी बाधा पोहोचेल परंतु, काही जागेवर स्थानिक आदिवासींची शेती असून पाहणी दरम्यान त्यांनी विरोध केला होता आणि चौथा पर्याय कारशेडसाठी कमी जागा वापरावी असा होता.

कांजुरची जागा मिळत नसेल तर आरेतच डबल डेकर कारशेड बांधण्याची शिफारस आहे. डबल डेकर कारशेडमुळे २०.८२ हेक्टर जागेची बचत होईव व फक्त ४४६ झाडांना बाधा पोहोचेल. मात्र, अशा प्रकारच्या कारशेडसाठी ७५० कोटी खर्च येईल. (उत्तरार्ध)